**नि.फौ.प्र.क्र. ११९/२०२०**<br>
**निशाणी क्र. ३५**

<u>**सरकारतर्फे साक्षीदार क्र. ०२ यांचा शपथेवर पुरावा**</u>

मी शपथेवर कथन करतो/करते की,

माझे नांव – सचिन भिकाराम बागडे,

वय – ४३ वर्षे, व्यवसाय – सरपंच, शेती व खाजगी नोकरी,

राहणार – सावरी, ता.लाखनी, जि. भंडारा.

**सरतपास सरकारतर्फे सहाय्यक सरकारी वकील श्रीमती एन. पी. वैद्य यांचेमार्फत–**

पोलिसांनी मला सुचनापत्र दिले होते. आता मला सुचनापत्र दाखविले. त्यावर पंच क्र.१ म्हणून माझी सही आहे. त्यातील मजकूर वाचुन सांगतो की, तो बरोबर आहे. सुचनापत्रास <u>**नि.क्र.३६**</u> देण्यात येत आहे. त्यानंतर मग आम्ही ग्रामपंचायतमध्ये गेलो. मी ग्रामपंचायतमध्ये बसलो असतांना मला फोन आल्यावर जेथे पंचनामा चालू होता तेथे मी गेलो. ग्रामपंचायतीच्या बाजुलाच भुरे ज्यांच्याबाबत हा प्रकार झाला त्यांचे घर होते. मी तेथे पोहोचलो, पोलिस होते. मौकास्थळ हे माकडेबाई यांच्या पानठेल्याच्या बाजुला होते. आता मला घटनास्थळ पंचनामा दाखविला. घटनास्थळामधील हातनकाशातील ठिकाण तेच आहे. घटनास्थळाच्या समोर पानठेला आहे. पोलिसांनी त्यांची विचारपूस केली. त्यातील मजकूर बरोबर आहे. पंचनामा केला होता. घटनास्थळ पंचनाम्यावरील सही माझी आहे. घटनास्थळ पंचनाम्यास <u>**नि.क्र.३७**</u> देण्यात येत आहे.

**उलटतपास आरोपीतर्फे वकील श्री. के. व्ही. येळेकर यांचेतर्फे –**

२. हे खरे आहे की, मला आता ज्या सह्या दाखविल्या त्या सर्व सह्या पोलिसांनी एकाच वेळी घेतल्या होत्या. हे खरे आहे की, मी गावचा सरपंच असल्यामुळे पोलिस माझ्याकडे ग्रामपंचायतमध्ये आले व मला सह्या करा म्हणाले, मी सह्या केल्या. हे खरे आहे की, माझ्यासमक्ष पोलिसांनी घटनास्थळावर कोणतीही लिखापढी केली नाही.

**फेरतपासः**– काही नाही.

वा.दा.ब.अ.क.केले. समक्ष,

स्वा/–

दिनांकः– ०६.०२.२०२४ (रा. सु. धडके)

न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, लाखनी.